**वाचले:-** १) अर्जदार सेक्रेटरी, श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर), जुन्नर यांचेकडील क्र. १५/२०१९-२०, दि. ०६/०७/२०१९ (प्रत्यक्ष प्राप्त दि. ०६/०८/२०१९) रोजीचा तहसिलदार जुन्नर यांचे कार्यालयाकडे केलेला विनंती अर्ज.

२) या कार्यालयाकडील आदेश क्र. पमग/सीआर/०६/२०११, दिनांक:-२१/०५/२०११

३) उपविभागीय अधिकारी जुन्नर-आंबेगाव यांचेकडील अहवाल क्र. जमीन/कावि/१०५८/२०१९, दि. ११/१२/२०१९, क्र. जमीन१/कावि/२६९/२०२०, दि. ०७/०२/२०२० व क्र. जमीन१/कावि/११८४/२०२०, दि. १२/१०/२०२०.

४) महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक - १६/११/२०१८.

---

**जिल्हाधिकारी कार्यालय पुणे**
**(महसुल शाखा)**
क्र. पमग/सीआर/०१ /२०२१
दिनांक:- ०६ /०१/२०२१

**विषय:- भाडेपट्टा मुदतवाढ...**
मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथील क्रिडांगणासाठी प्रदान केलेल्या गट नंबर १३ मधील क्षेत्र १ हे ४२ आर जागेच्या भाडेपट्यास मुदतवाढ देणेबाबत....

**आदेश,**

ज्याअर्थी, मौजे पाडळी, ता. जुन्नर, जि. पुणे येथिल गट नंबर १३ मधील १ हे ४२ आर क्षेत्र क्रिडांगणासाठी १५ वर्षे भाडेपट्याने दिलेल्या जमिनीस मुदतवाढ मिळणेबाबत सेक्रेटरी, श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर), जुन्नर यांनी तहसिलदार जुन्नर यांचे कार्यालयाकडे दि. ०६/०७/२०१९ (प्रत्यक्ष प्राप्त दि. ०६/०८/२०१९) रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

२. ज्याअर्थी, सदर संस्थेस १ हे ४२ आर क्षेत्र सन १९४१ मध्ये क्रिडांगणासाठी १५ वर्षाचे भाडेपट्याने मंजूर करण्यात आले होते. सदर भाडेपट्याची मुदत सन १९५६ मध्ये संपली होती. तद्नंतर या कार्यालयाकडील आदेश क्र. पमग/सीआर/०६/२०११, दि. २१/०५/२०११ अन्वये संस्थेला सन १०/११/१९८९ पासून पुढील ३० वर्षांकरिता भाडेपट्यास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ ऑक्टोबर २०१९ रोजी संपलेली आहे.

३. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी नमुद आहेत:-

१) क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनाच्या वापराकरिता वर नमूद केल्याप्रमाणे भाडेपट्याने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्याचे नुतणीकरण करताना अशा जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार येणा-या मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाडयाची रक्कम म्हणून आकारण्यात यावी.

२) अशा संपुष्टात असलेल्या भाडेपट्याचे नुतणीकरण मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून ३० वर्ष इतक्या कालावधीपर्यंत करण्यात यावे.

३) ज्या भाडेपटयांचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी संपुष्टात आलेला असून व ज्या भाडेपट्यांचे अद्याप नुतनीकरण करण्यात आलेले नाही, अशा भाडेपट्यांचे मानीव नुतनीकरण भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून दि. ३१.१२.२०१७ पर्यंत जुन्या दराने भुईभाडे वसुल करण्यात यावेत व दि. ०१.०१.२०१८ पासुन प्रस्तुत धोरणानुसार भुईभाडे वसुल करून

भाडेपट्याचे पुढील नुतनीकरण करण्यात यावे. अशा प्रकारे वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारणी करताना थकीत भुईभाडयावर व्याज आकारणी करण्यात येऊ नये.

४) संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी, अशा उक्त नमुद भाडेपट्याचे नुतनीकरण्या करण्यास सक्षम असतील (तथपि, बृहन्मुंबई क्षेत्रातील भाडेपट्याचे नुतनीकरणासाठी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.)

५) तसेच, संबंधित पट्टाधारक संस्थेने शर्तभंग केलेल्या असल्यास, अशा भाडेपट्याचे नुतनीकरण करण्यापुर्वी, संबंधीत जिल्हाधिकारी यांस शासनाची पुर्व मान्यता घेणे आवश्यक राहील.

४. ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. पमअ-१/कावि/६४५/२०२०, दिनांक:- ०६/११/२०२० अन्वये कळविलेली वार्षीक भुईभाडयाची रक्कम रु. २९६८/- ही प्रतिग्रहिता यांनी दिनांक १०/११/२०२० रोजी शासन जमा करून चलन क्र. MH००६८३७३०७२०२०२१M व त्याचा डिफेसमेंट नंबर ०००३५३५८८०२०२०२१, दि. ०३/१२/२०२० या कार्यालयास सादर केलेली आहे.

५. त्याअर्थी मी, डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार मला प्रदान असलेल्या अधिकारान्वये मौजे पाडळी, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर), जुन्नर यांचे शाळेच्या क्रिडांगणाकरीता प्रदान करणेत आलेल्या १ हे ४२ आर जागेस मुळ जागा प्रदान आदेशातील अटी व शर्तींच्या अधीन राहून त्याचप्रमाणे दिनांक:- १६/११/२०१८ चे शासन निर्णयामधील तरतुदीनुसार जमिनीच्या वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १०% रक्कमेच्या ०.१% इतकी रक्कम त्या-त्या वर्षीच्या वार्षिक भुईभाडयाची रक्कम म्हणून शासन जमा करणेबाबतच्या तसेच शासकीय जमीन प्रदान केलेबाबतचा नमुना १८ चा बोर्ड सदर जागेतील इमारत/सिमाभिंतीच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणेबाबतच्या अटीवर दिनांक:- ०१/१०/२०१९ पासून दिनांक:- ३०/०९/२०४९ या ३० वर्षाकरीता भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात येत आहे.

## अटी व शर्ती

१) संस्था सदर जमीन भाडेपट्टादार वर्ग-२ म्हणून धारण करील.

२) सदर जागेचा वापर क्रिडांगण प्रयोजनासाठीच करावयाचा असून अन्य प्रयोजनासाठी जागेचा वापर केल्यास भाडेपट्टा रद्द करून प्रश्नाधिन जागेचा ताबा घेतला जाईल व कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

३) क्रीडांगण प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने दिलेल्या प्रश्नाधिन जागेत कोणत्याही प्रकारचे स्वरूपाचे बांधकाम करता येणार नाही.

४) मंजूर करण्यात आलेली जमीन संस्था भाडेपट्टेदार म्हणून धारण करील व शासनाच्या पुर्वपरवानगीशिवाय हस्तांतरीत / गहाण / तारण करणार नाही.

५) प्रश्नाधिन जमीनीच्या भाडेपट्याची मुदत संपण्यापुर्वीच जर सदर जमीन शासकीय प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी यांनी तशी नोटीस दिल्यापासून १५ दिवसाच्या आत शासनास विना तक्रार परत करावी लागेल.

६) भाडेपट्याची मुदत संपल्यानंतर भाडेपट्टाधारकाने जागेचा खुला ताबा विना तक्रार शासनास दिला पाहीजे.

७) सदर जागेतील दगड, मुरूम, माती इ. कोणत्याही प्रकारचे गौण खनिजाचे उत्खनन करू नये.

८) भाडेपट्टा मंजूर करण्यात आलेले १ हे ४२ आर क्षेत्राचाच क्रीडांगण प्रयोजनासाठी वापर करावा अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या पुर्वमान्यतेशिवाय वापर करता येणार नाही. सदर क्षेत्राचे लगतचे क्षेत्रावर अतिक्रमण करू नये.

९) मुळ जागा प्रदान आदेशातील सर्व अटी / शर्ती प्रतिग्रहिता संस्था यांचेवर बंधनकारक राहतील.

१०) शासकीय जमीन प्रदान केलेबाबतचा नमुना-१८ चा बोर्ड सदर जागेतील इमारत / सिमाभिंतीच्या दर्शनी भागावर प्रदर्शित करणे प्रतिग्रहिता संस्था यांचेवर बंधनकारक राहील.

११) शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार जमिनीच्या वार्षीक मुल्यदर तक्त्यानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १०% रक्कमेच्या ०.१% इतकी रक्कम त्या त्या वर्षाची वार्षीक भुईभाड्याची रक्कम म्हणुन शासन जमा करणेत यावी.

१२) प्रतिग्रहित्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा होण्यास पात्र राहील.

जिल्हाधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

(डॉ. राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे.

प्रति,
अध्यक्ष,
श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर) जुन्नर,
ता. जुन्नर, जि. पुणे

कारी
जयते
पुणे